


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २३९ ●शुक्रवार,दि.२८ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या बीड शहरातील कचरा डेपोतील प्लास्टिकमुळे गायींचा जीव धोक्यात!



## राज्य सरकारने दिलेला 'राजमाता' सन्मान फक्त घोषणापुरताच का? : डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर





**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गायीला राजमातेचा दर्जा देण्याचा निर्णय नुकताच जाहीर झाला आणि या निर्णयाचे जनतेत स्वागतही झाले. मात्र पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या गृह जिल्ह्यातच गायींचे प्राण धोक्यात आले असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. शहरालगतच्या खंडेश्वरी – श्री खंडोबा मंदिर रस्त्यालगत नगरपालिकेने सुरू केलेल्या कचरा डेपोमुळे येथे भटकणाऱ्या गायी प्लास्टिक, काच, लोखंडासारखा जीवघेणा कचरा खात आहेत. त्यामुळे गायींच्या आरोग्यावर थेट जीवघेणा परिणाम होतो असून, हा डंपिंग ग्राउंड अधिकृत आहे की अनधिकृत याविषयीही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात गायरान जमिनीचा बेकायदेशीर वापर केला जात असल्याच्या तक्रारी वाढल्या असून, हे महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे खुले उल्लंघन असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे. सदर प्रकरणाची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचारप्रसार प्रमुख (माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र ▶ उर्वरित पान २ वर

### ● गायरान जमीन कायदेशीर हक्काची – पण बीडमध्येच तिचा डंपिंग ग्राउंडसाठी वापर?

**गायरान जमीन ही कायद्यानुसार सरसकट जनावरांच्या चरण्यासाठी राखून ठेवलेली सार्वजनिक संपत्ती आहे. या जमिनीचा वापर – कचरा डेपो, अवैध बांधकाम, राजकीय/व्यावसायिक वापर करण्यास स्पष्ट कायदेशीर बंदी आहे. मात्र बीड शहरातच गायरान जमीन डंपिंग ग्राउंडसाठी वापरली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून नगरपालिकेने यात आपली स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी झाली आहे.**

### ● कचरा खाताना गायींच्या आरोग्याचा जीवघेणा प्रश्न



**शहरालगतच्या कचरा डेपोजवळ गायी चरत चरत कचऱ्यातील प्लास्टिक व हानिकारक वस्तू खातात. यामुळे– पोटात प्लास्टिक, काचा, लोखंड जमा होते. आंत्रविकार, पचनसंस्थेचे गंभीर आजार, प्राणघातक परिस्थिती, मृत्यूचे प्रमाण वाढते. याकडे यंत्रणांनी गंभीरतेने कधी पाहणार? असा थेट सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.**

# महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे आजपासून परळीत

## विविध प्रभागातील नागरिकांच्या भेटी घेऊन साधणार संवाद

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैद्यनाथ नगर परिषद निवडणुकीत आज (शुक्रवार) पासून सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ परळी शहरातील विविध प्रभागाचा दौरा करणार आहेत. शुक्रवारी सकाळी ८ वाजल्यापासून प्रभाग क्रमांक ६ मधून या दौऱ्यास सुरुवात होणार असून, त्या संबंधित उमेदवार व पदाधिकारी यांच्या सोबतीने स्थानिक नागरिकांच्या भेटी, बैठका घेऊन संवाद साधणार आहेत. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांची ▶ उर्वरित पान २ वर



# पीएसआय चा कारनामा; सराफा व्यापाऱ्याला लुटले!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चाललेले असताना पोलिस ही गुन्हेगारीत बरबटले असल्याचे समोर येत आहे. यामुळे पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.बीडमध्ये लॉजवर थांबलेल्या एका सराफा व्यावसायिकाला चक्क पोलीस अधिकाऱ्याने आणि इतर पोलिसांनी लुटले असल्याची खळबळ जनक घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील सराफा व्यापारी मयंक



शांतीलाल जैन हे कामासाठी बीड येथे आले होते. रात्री उशीर झाल्याने ते शहातील विशाल लॉजवर मुक्कामासाठी थांबले होते. त्यावेळी अचानक शहरातील शिवाजीनगर येथील पोलीस उप निरिक्षक गजानन ▶ उर्वरित पान २ वर

# बाळासाहेब गुंजाळ यांनी केलेल्या कामांमुळे जनतेनेच त्यांची निवडणूक हाती घेतली

## काम करत आलोय, काम करत राहू फक्त आशिर्वाद द्या : बाळासाहेब गुंजाळ

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्र.२१ ब मधील अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस , शिवसेना आणि शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार धर्मराज ऊर्फ बाळासाहेब लक्ष्मण गुंजाळ यांनी आत्तापर्यंत केलेल्या कामांमुळे जनतेनेच त्यांची निवडणूक हाती घेतली आहे. आजपर्यंत ▶ उर्वरित पान २ वर



# आपल्याला राज्यसरकारची साथ आहे त्यामुळे आपण सरोटोपरी विकास करु : मा. मंत्री जयदत्त क्षीरसागर



### मुख्यमंत्री, पंकजाताईंसह जयदत्तअण्णांमुळे भाजपचा विजय होणार:डॉ.योगेश क्षीरसागर

**बीडमध्ये पहिल्यांदाच भाजप संपूर्ण ताकदीने निवडणूक लढवीत आहे. आपल्या भागाचा आणखी विकास व्हावा, यासाठी आमच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंकजाताई मुंडे, जयदत्त क्षीरसागर यांच्यामुळे भाजपचा विजय होणार हे निश्चित आहे, असा विश्वास भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.**

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारची मजबूत साथ असल्याशिवाय शहराच्या विकासाची गाडी पुढे जात नाही. राज्य आणि केंद्र सरकारच्या समन्वयातूनच मुलभूत सुविधा, योजना आणि निधी मिळतो. त्यामुळे बीडच्या विकासासाठी राज्य सरकारची साथ असलेले लोकप्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त ▶ उर्वरित पान २ वर

# योगेश भैया..! स्व. काकूंच्या विचाराला मूठ माती दिली मग सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचा चेहरा असलेल्या दीपाताई क्षीरसागर प्रचारापासून अलिप्त का?

**बीड । प्रतिनिधी**

राजकारणा सोबतच नाट्य, सांस्कृतिक, सामाजिकचळवळीचाचेहराअसलेल्यादीपाताई क्षीरसागर यांनी बीडच्या सर्वांगीण विकासात मोलाचा हातभार लावला. त्या मात्र या वेळेच्या न.प. निवडणुकीच्या प्रचारापासून अलिप्त का? बीडच्या विकासात या चळवळीचं महत्व नाही का? स्व. काकूंच्या विचारधारे सारखीच सांस्कृतिक चळवळींना देखील मूठ माती देत झुंडशाहीला बळकटी द्यायचीय का? असे एक ना अनेक प्रश्न जनतेतून विचारले जात आहेत.

बीड शहर तसं सांस्कृतिक वारसा जोपासणारं आहे.डॉ. भारतभूषण क्षीरसागर व दीपाताई क्षीरसागर यांनी नाट्य, सांस्कृतिक,



सामाजिक, साहित्यिक यासारख्या चळवळी राबवून बीडच्या सर्वांगीण विकासात मोलाचं योगदान दिलं.त्यामुळे या चळवळींच्या माध्यमातून बीडची नवी ओळख निर्माण झाली. नुसता शहराचा रस्ते ,नाल्यांचा विकासच नाही तर समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या कार्यशैलीचाच परिणाम म्हणून प्रत्येक वेळी न प निवडणुकीत डॉ. भारतभूषण बुद्धिवादी वर्गाने डोक्यावर घेतलं. प्रचंड जनसंपर्क, व्यक्तिगत संबंधाच्या जोरावर जातीपाती धर्माचा राजकारण न करता विरोधकांनाही आपलंस करण्याची वृत्ती प्रत्येक निवडणुकीत यश देत गेली. मात्र योगेश भैया तुम्ही स्व. काकूंच्या विचारधारेलाच मूठ माती दिली नाही तर बीडच्या सर्वांगीण विकासाला खिळ बसवण्याचा चंग देखील बांधला आहे असं चित्र सध्यातरी दिसत आहे. सामाजिक शैक्षणिक राजकीय ,नाट्य, सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून शहराच्या विकासाला चालना मिळत असते ▶ उर्वरित पान २ वर

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते राम खाडे यांच्यावर जीवघेणा हल्ला



**बीड । प्रतिनिधी**

शरद पवार गटाचे नेते राम खाडे यांच्यावर बुधवारी रात्री जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. प्राथमिक माहितीनुसार, हिल्यानगर – बीड जिल्ह्याच्या सीमेलगत मांदगाव जवळ रस्त्यावर हा हल्ला झाल्याची माहिती आहे. राम खाडे हे सामाजिक कार्यकर्ते आणि शरद पवार गटाचे पदाधिकारी आहेत. ते मांदळी गावातून बीड जिल्ह्यात येत होते. राम खाडे गाडीतून जात असताना दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने त्यांची गाडी थांबवून थेट हल्ला चढवला. सुरुवातीला या हल्लेखोरांनी गाडीची नासधूस केली. हल्लेखोरांनी राम खाडे यांच्या गाडीवर जोरदार दगडफेक केली. तसेच गाडीचे साईड मिरर फोडले. यानंतर धारदार शस्त्रांनी राम खाडे यांच्यावर हल्ला केला. राम खाडे यांनी काही वार हातावर झेलले. परंतु, इतर हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. यामध्ये राम खाडे यांना गंभीर दुखापत झाली आहे.

राम खाडे यांच्यावर सुरुवातीला अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. रुग्णालयात नेईपर्यंत त्यांची शुद्ध पूर्णपणे हरपली होती. त्यांचा हात ▶ उर्वरित पान २ वर

# २ डिसेंबरनंतर राज्यात होणार मोठी राजकीय उलथापालथ? शरद पवार गटाची मोठी खेळी



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत, या निवडणुकीमध्ये जवळपास सर्वच पक्षांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्यानं अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना शिंदे गट आमने–सामने आल्याचं पहायला मिळतं आहे. या ▶ उर्वरित पान २ वर

# मंत्री पंकजाताईंकडून लाडके जगदीश गुरखुदे यांचे तोंडभरुन कौतूक

## प्र. क्र.७.मध्ये भाजपाच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे मंत्री पंकजा मुंडेंचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

गदीश गुरखुदे यांचा कार्यक्रम म्हटला की मी स्वतः धाव घेते. त्यांचे नियोजन हटके, दर्जेदार आणि उत्सवसदृश असते. फटाके, फुलांची उधळण, जल्लोष पाहिलं की रामनवमीचा कार्यक्रम आहे की प्रचारसभा, हेच कळत नाही. अशा शब्दांत त्यांनी गुरखुदे यांचे कौतुक






करत कमळाला अभूतपूर्व विजय मिळवून देण्याचे आवाहन केले.

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे चार दिवस शिल्लक असताना भाजपाच्या प्रचाराने भरारी घेतली आहे. प्रभाग क्र. ७ (अ) मधून भाग्यश्री देशपांडे तर ७ (ब) मधून जगदीश फुलचंद गुरखुदे यांना पक्षाकडून अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे. नगराध्यक्षपदासाठी डॉ.ज्योती घुंबरे यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि. २६) आयोजित जाहीर सभेला मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीमुळे प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना पंकजाताई ▶ उर्वरित पान २ वर



# महात्मा फुले : सामाजिक क्रांतीचे शिल्पकार

भारतीय समाजाच्या इतिहासात १९व्या शतकाने एक मूलभूत परिवर्तनाची दिशा निश्चित केली आणि या परिवर्तनाच्या मध्यभागी महात्मा फुले हे व्यक्तिमत्त्व अग्रगण्य ठरले. जात, पंथ, लिंग आणि वर्ण यांच्या आधारे शतकानुशतके स्थिरावलेल्या असमानतेच्या प्रथांना त्यांनी विचारांच्या तलवारीने छेद दिला. त्यांचा दृष्टिकोन संघर्षाचा होता, परंतु तो संघर्ष द्वेषावर आधारित नव्हता; तो न्याय, विवेक आणि मानवतेवर आधारलेला होता. म्हणूनच जेथे वैर, शोषण, अन्याय आणि दमन होते तेथे त्यांनी समतेचे, शिक्षणाचे आणि स्वातंत्र्याचे विचार रुजविले. त्यांच्या समाजकार्याने भारतीय सामाजिक विचारसरणीला नवी दिशा दिली आणि भारतीय मानवमूल्यांच्या पुनर्रचनेसाठी ते एक प्रेरणादायी अध्याय ठरले. आज त्यांच्या स्मृतीदिनी त्यांचे कार्य समजणे म्हणजे फक्त इतिहास स्मरण करणे नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात न्याय, समानता आणि मानवी हक्कांच्या दिशेने पुढे जात राहण्याची शिकवण घेणे होय.



महात्मा फुले यांचे जीवन पाहताना जाणवते की ते फक्त विचारवंत नव्हते; ते समाजाचे निरीक्षक, त्याचे विश्लेषक आणि परिवर्तनासाठी एकत्रित कृतीचा मार्ग सुचवणारे होते. बालवयातच त्यांच्या मनाला स्पर्शलेली जातिभेदाची वेदना पुढे त्यांच्या संपूर्ण कार्याची प्रेरणा ठरली. शिक्षणाची संधी मिळूनही समाजाच्या एका वर्गावर केवळ जातनिहाय शिक्षणाचा हक्क नाकारला जात होता, हे वास्तव त्यांना खूप बोचले. म्हणूनच त्यांनी पहिली लढाई शिक्षणाच्या क्षेत्रातून सुरू केली. स्त्रियांचे शिक्षण आणि बहुजन समाजाच्या मुलांसाठी शैक्षणिक दार खुले करणे हे त्यांच्या संघर्षाचे पहिले पाऊल होते. सन १८४८ मध्ये पुण्यात त्यांनी आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली मुलींची पहिली शाळा हा भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा पहिला प्रकाशकिरण ठरला. शिक्षण ही फक्त माहिती मिळवण्याची पद्धत नसून विचार, स्वातंत्र्य आणि स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. स्त्रीला शिक्षण मिळाल्यास कुटुंब, समाज आणि पुढील पिढी सुशिक्षित होते, ही त्यांची दृष्टी आजही विकासाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आढळते.

त्यांच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांचे स्थान अविभाज्य आहे. स्त्री शिक्षणात आणि सामाजिक आंदोलनात त्यांनी दिलेली साथ ही जगातील स्त्री मुक्ती चळवळींच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. सावित्रीबाईंच्या पाठीशी उभे राहून त्यांना मार्ग दाखवणे, समाजाच्या दगडफेक-अपमान आणि मानसिक आघातासमोर दृढ राहण्याची प्रेरणा देणे हे महात्मा फुले यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी स्त्रीला फक्त शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता तिला मानव म्हणून तिचे अधिकार दिले. त्याच काळात, जेव्हा स्त्रियांच्या माथ्यावर सतीप्रथा, बालविवाह, विधवांचे अमानुष जीवन आणि समाजाच्या कडेवर जगणे ही वास्तवता होती, तेव्हा फुले यांनी विवाहसंस्थेतील पुनर्रचनेची गरज मांडली. विधवांना पुन्हा विवाहाचे स्वातंत्र्य मिळावे आणि त्यांना समाजात सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी त्यांनी समाजसुधारणेची चळवळ उभी केली. विधवेस गर्भ असल्यास तिचे रक्षण व्हावे, समाजाने तिला आधार द्यावा, म्हणून त्यांनी 'बालहत्याप्रतिबंधक गृह' स्थापन केले. त्या काळात अशा विचारांची कल्पना करणे देखील समाजासाठी आघातक होते, परंतु फुले निर्धाराने या दिशेने उभे राहिले.

महात्मा फुले यांचा समाजदृष्टीत 'सत्यशोधक' दृष्टीकोन सर्वात महत्त्वाचा आहे. त्यांनी समाजातील देव, धर्म आणि परंपरांना प्रश्न विचारला: हा धर्म मनुष्याला बांधून ठेवतो की मुक्त करतो? त्यांच्या मते धर्म हा समतेवर आधारित असावा, निसर्गनियमांशी सुसंगत असावा आणि प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून समान सन्मान मिळवून द्यावा, अन्यथा तो धर्म नसून अनीत्याची व्यवस्था असते. म्हणूनच त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने समाजातील जातीय असमानता, रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता यांना प्रत्युत्तर दिले. सत्यशोधक विवाहपद्धती समाजासाठी नवीन वळण ठरली. या विवाहात हुंडा, खर्चिक विधी किंवा ब्राह्मण पुरोहितांची आवश्यकता नव्हती. विवाहाचे आधारस्तंभ होते, त्यामध्ये समानता, संमती आणि मानवी मूल्ये, या विवाह व्यवस्थेने समाजातील शोषितांना पहिल्यांदा सन्मानाने विवाह करण्याचा अधिकार दिला.

शेतकरीवर्ग, कृषीव्यवस्था आणि सामाजिक-आर्थिक विषमता यांवर फुले यांनी केलेले चिंतन आजही आधुनिक समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमाचा आधार आहे. कृषीव्यवस्था, जमीनदारी, करप्रणाली आणि दलालपद्धती यांमधील विषमता त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकाद्वारे स्पष्ट केली. शेतकरी हा अन्नदाता असूनही तो गुलामासारखे जीवन जगतो, हे त्यांनी निर्भीडपणे प्रतिपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी आणि बहुजन समाजाला आपण गुलाम का आहोत याचे भान निर्माण करणे हा त्यांचा केंद्रबिंदू होता. यामुळे समाजस्वातंत्र्य आणि आत्मभानाची प्रक्रिया सुरू झाली. त्यांनी सांगितले की मनुष्याने मनुष्याला गुलाम मानणे ही पापाची पराकाष्ठा आहे आणि या पापातून मुक्त होण्यासाठी शिक्षण आणि संघटन हा मार्ग आहे.

भारतीय स्त्री-पुरुष, जात-पात, धार्मिक असमानता आणि आर्थिक शोषण यांच्या विरोधात फुल्यांनी केलेल्या संघर्षाचा विस्तार फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. त्यांची विचारधारा पुढे भारतातील सामाजिक न्याय, आरक्षण, स्त्री समता, धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि मानवाधिकारांच्या पाया ठरली. त्यांचे कार्य भारतातील दलित-बहुजन चळवळींचे आद्यस्रोत ठरले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, पेरियार रामासामी यांसारख्या महान कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान त्यांच्याच कार्यातून उगम पावले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आधुनिक भारतातील महान सामाजिक अभियंता मानले.

महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजाला केवळ विरोध दिला नाही, तर पर्यायी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की समाजातील बदल विचारांपासून सुरू होऊन कृतीत उतरला पाहिजे. म्हणूनच त्यांचे प्रत्येक आंदोलन, प्रत्येक भाषण आणि प्रत्येक उपक्रम प्रत्यक्ष समाजपरिवर्तनाशी जोडलेला होता. त्यांच्या 'तृतीय रत्न', 'गुलामगिरी', 'सत्यशोधक समाज' आणि इतर लेखनात त्यांनी समतेचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. जोपर्यंत समाजात समानता नसते, तोपर्यंत स्वातंत्र्य निरर्थक आहे हा त्यांचा मूलभूत संदेश आजही भारतीय संविधानाच्या आत्म्याशी जोडलेला आहे.

**महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन.**

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## पर्यावरण व पशुसंवर्धन....

राज्य) डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी खालील मंत्र्यांना लेखी तक्रार केली आहे - पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री - पंकजा मुंडे, मुख्यमंत्री - देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री - अजितदादा पवार, महसूल मंत्री - चंद्रशेखर बावनकुळे, डॉ. ढवळे यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

'राजमाता'चा सन्मान फक्त कागदावर? - डॉ. ढवळे

गायीला राजमातेचा सन्मान देतो म्हणणारे सरकार तिच्या चराईच्या हक्कावर होणारे आक्रमण थांबवणार कधी? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. गायरान जमीन कमी केल्यानेच जनावरं शहरात भटकतात, कचरा खातात आणि मृत्यूला सामोरी जातात. ही व्यवस्थात्मक चूक असून जनावरांना दोष देणे म्हणजे अन्याय असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

डॉ. ढवळे व पर्यावरणप्रेमींच्या ठोस मागण्या- १) कचरा डेपो तातडीने सुरक्षित स्थळी हलवावा किंवा बंदिस्त करावा. २) गायराण जमिनीवरील अतिक्रमणांची तपासणी व उठावणी. ३) जनावरांसाठी मुक्तपणे फिरण्याची व चरण्याची जागा पूर्ववत करावी. ४) राज्यस्तरीय गायराण संरक्षणासाठी स्वतंत्र निरीक्षण प्राधिकरण स्थापन करावे.५) गायराण वापरबदल करताना ग्रामसभेची संमती बंधनकारक करावी. ६) पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, नगरविकास मंत्री, पालकमंत्री यांनी चौकशी करून कारवाई करावी.

## महायुतीच्या उमेदवारांच्या...

परळी शहरातील नागरिकांशी घट्ट नाळ जोडलेली असून त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. याआधीही त्यांनी लोकसभा, विधानसभा आदी निवडणुकीत प्रचारात सहभाग घेतलेला आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाचा मार्ग यामुळे अधिक सुकर होणार आहे.

## पीएसआय चा...

क्षीरसागर आणि इतर पोलीस कर्मचारी त्यांच्या रूममध्ये दाखल झाले. त्यांच्या जवळील सोन्याचे दागिने आणि मोबाईल पोलिसांनी जप्त करून सर्व प्रकारचा संपर्क बंद केला.त्यानंतर त्यांच्यावर सतत दबाव टाकत ७ लाख रुपये आणण्याची मागणी करण्यात आली. मात्र जैन यांच्याकडे एवढी मोठी रक्कम नसल्याने त्यांनी नकार दिल्यावर पोलिसांनी कथितपणे मेडिकल खर्च सांगत दुसऱ्या एका स्थानिक व्यापाऱ्याकडून ४ लाख रुपये मागवण्यास भाग पाडले.ही रोख रक्कम गजानन क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष घेतल्याचे सांगितले जाते. इतक्यावरच न थांबता, जैन यांना रात्री उशिरा दुसऱ्या एका लॉजवर नेऊन संपूर्ण रात्र डांबून ठेवण्यात आले. पहाटेच्या

◆ पान १ वरून पुढे...

सुमारास आरोपींनी उर्वरित ३ लाख रुपये सकाळी १२ वाजेपर्यंत आणण्याचे आदेश देत त्यांना सोडून दिले.या घटनेनंतर जैन यांनी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेतली आणि आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्याची विनंती केली.

## बाळासाहेब गुंजाळ....

जनसेवेसाठी काम करत आलोय आणि यापुढेही काम करत राहू ,तुम्ही फक्त आशिर्वाद द्या असे आवाहन बाळासाहेब गुंजाळ यांनी केले आहे. बीड शहरातील प्रभागातील असो की इतर ठिकाणच्या नागरिकांचे कोणतेही काम असो त्या ठिकाणी बाळासाहेब गुंजाळ २४ तास सेवेत असतात. पाणी, रस्ते, नाल्या, लाईट या मुलभूत सुविधांसाठी ते नेहमीच तत्पर असतात. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या या माझ्या स्वत:च्या समस्या आहेत असेच समजून त्यांनी आत्तापर्यंत लोकांची कामे केली आहेत. बीड शहरातील प्रभाग क्र.२१ मधील गांधी नगर हा भाग २०११ च्या पूव बहिरवाडी ग्रामपंचायत हद्दीत येत होता. मात्र २०११ मध्ये या भागाचा न.प.हद्दीमध्ये समावेश झाला. तेव्हापासून आजपर्यंत बाळासाहेब गुंजाळ यांनी या भागामध्ये तीन पाण्याच्या टाक्या उभ्या केल्या. वादात असलेली जागा नगर पालिकेला मिळवून देवून त्या ठिकाणी या टाक्या उभा करण्याचे काम त्यांनी केले. नाळवंडी रोड, नगर परिषदत हद्दीमधील रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली होती. हा रोड जिल्हा परिषद हद्दीत असतानाही हा रस्ता नगरपालिकेकडून मंजुर करुन घेत लोकांची गैरसोय दुर केली. नाथापुर रोड हा रस्ता तेलगाव नाका ते खंडेश्वरी पर्यंत करुन घेतला.

## आपल्याला राज्यसरकारची....

क्षीरसागर यांनी केले. बीड शहरातील राजीव गांधी चौकात गुरुवारी (दि.२७) भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह प्रभाग क्रमांक ९ मधील जयश्री मच्छिंद्र कुटे, शीतल दत्ता गायकवाड, प्रभाग क्रमांक १० मधील मंगेश अंबादास धोंगडे, भाग्यश्री अशोक तांबारे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, डॉ.ज्योती घुंबरे, ॲड.रामहरी तांदळे, बालाजी पवार, ॲड.महेश गर्जे, संतोष मिसाळ, नंदकुमार झरेकर, अनिता जाधव, मुकेश कुटे, राजू पिंगळे, ॲड.नागेश तांबारे, राजू महूवाले, सुरेश शिंदे, संतोष कंठाळे, सुरेखा माने, अर्जुन जाधव, विठ्ठलराव वनवे, डॉ.भावले, सुरेश पवार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, स्थानिक नेते उपस्थित होते. पुढे बोलताना ते जयदत्त क्षीरसागर म्हणाले, भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती रवींद्र घुमरे या प्रभाग क्रमांक ९ व १० मधीलच रहिवासी असल्याने या भागाच्या विकासाकडे त्यांचे विशेष लक्ष राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पूर्वी या परिसराची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था होती. परंतु भाजपच्या सत्ताकाळात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता यासह सर्व मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. आज राजीव गांधी चौक परिसराचा कायापालट झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. हुतात्मा स्मारक, जिजाऊ पुतळा, वसंतराव नाईक यांचे पुतळे उभारून आम्ही केवळ आश्वासनांवर नव्हे तर कृतीतून विचार दाखवले आहेत. या भागातील नागरिक भान आणि जाण असलेले असून आम्ही केलेल्या कामांवरच मते मागत आहोत, असेही क्षीरसागर यांनी सांगितले. लोकांची सेवा करताना 'रेटकार्ड' वापरणाऱ्या लोकांना निवडून देऊ नका. तुमची सालगड्याप्रमाणे निष्ठेने सेवा करणारे आमचे उमेदवार निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

◆ पान १ वरून पुढे...

## योगेश भैया...

त्या चालनेला खंडित करायचं काम होत असल्याचं दिसू लागला आहे. नुसतं काँक्रेट जंगल तयार करून शहराचा विकास होत नसतो, तर क्रियाशील समाज निर्मितीतूनच शहरं आपली ओळख निर्माण करतात याचा विसर पडल्यानेच डॉ. दीपाताई क्षीरसागर यांना प्रचारात पासून अलिप्त ठेवण्याचं काम केलं जाऊ लागला आहे. त्यामुळे बुद्धिवादी वर्गामध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून याचा फटका निवडणुकीत बसणारच असं राजकीय विश्लेषक सांगू लागले आहेत. शेवटी तो तुमचा घरचा विषय आहे पण बीडच्या जनतेला दीपाताईंची अनुपस्थिती खटकू लागली आहे. त्यातच दीपाताई क्षीरसागर यांनी कधीच निवडणूक काळात मर्यादा भंग होईल अशी भाषा वापरली नाही. मात्र स्थानिक दैनिकाला सारिका क्षीरसागर यांना मर्यादांचे भान ठेवा असा सल्ला द्यावा लागला. हे बीडच्या सांस्कृतिक अध: पतन कसं होणार आहे याचा नमुना ठरणार उदाहरण आहे. योगेश भैय्या! तुम्ही काकूंच्या विचाराचे होणार नाहीत.तुम्हाला दीपाताईंसारखे सुसंस्कृत चेहरे नकोत ? मग तुम्हाला जनतेने का स्वीकारायचं? तुमच्या हातात न प ची सत्ता देऊन शहर बकाल करायचं का? ध्रुवीकरण करणाऱ्या पक्षाची स्वार्थासाठी तुम्ही धरलेली कास जनतेच्या पचनी का पडावी? असे एक ना अनेक प्रश्न जनतेला पडू लागले आहेत.

## शरद पवारांच्या...

रक्तबंबाळ झाला होता. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरु केला आहे. परंतु, राम खाडे यांच्यावर हल्ला कोणी केला, हे अद्याप कळू शकलेले नाही. दरम्यान, बीड जिल्ह्यातील शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांना प्रकृती चिंताजनक झाल्याने अहिल्यानगरमधील रुग्णालयातून त्यांना तातडीने पुण्यात हलविण्यात आले. रात्री नगर - सोलापूर महामार्गावर मांदळी गावाजवळ खाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर अज्ञात हल्लेखोरांनी जीवघेणा हल्ला केला होता.

◆ पान १ वरून पुढे...

हॉटेलमध्ये जेवण करून नगरकडे निघाल्यानंतर रात्रीच्या वेळी १० ते १५ जणांनी तोंडाला रुमाल बांधून लाठ्या, तलवार, पिस्तूल आणि सत्तूरने अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात राम खाडे यांच्यासह त्यांचे तिघे सहकारी गंभीर जखमी झाले होते. हल्ल्याच्या ठिकाणाहून पळताना एका हल्लेखोराच्या हातातून सत्तूर खाली पडल्याची माहिती असून घटना स्थळावरील व्हिडीओमध्ये सत्तूर असल्याचे दिसत आहे. दरम्यान हा हल्ला राजकीय द्वेषातून करण्यात आल्याचा दावा खाडे यांचे जखमी सहकारी दीपक खिळे यांनी केला.

## २ डिसेंबरनंतर ....

पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षातील संघर्ष देखील वाढला आहे, शिवसेना शिंदे गटातून भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरू असल्यानं शिवसेना शिंदे गट नाराज आहे, तर दुसरीकडे बुधवारी शिवसेना शिंदे गटाचे नेते निलेश राणे यांनी थेट भाजप कार्यकर्त्याच्या घरात घुसून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजप मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोप केला आहे, भाजपने हे आरोप फेटाळून लावले आहेत, मात्र यामुळे आता दोन्ही पक्षातील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे. यावर प्रतिक्रिया देताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. दोन तारखेपर्यंत मला युती टिकवायची आहे, त्यामुळे मी आता काही बोलणार नाही. मी नंतर उत्तर देईल.निलेश राणे जे आरोप करत आहेत ते खोटे आहेत, असं चव्हाण यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून आता शिवसेना शिंदे गटाला थेट युतीची ऑफर देण्यात आली आहे, याबाबत बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. शरद पवारांनी सांगितले होते, भाजप सोडून कुणाशीही आघाडी करा, त्यानुसार कुर्डूवाडीत आमची युती शिवसेना शिंदे गटासोबत झाली आहे.

## मंत्री पंकजाताईंकडून...

मुंडे यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचा उल्लेख करत कमळ वाडी-वस्ती तांड्यावर पोहोचवण्यापासून ते बीडच्या विकासापर्यंत आम्ही निधी कमी पडू देणार नाही. स्वच्छ, सुंदर, सुरक्षित बीडसाठी भाजपा कटिबद्ध आहे. आजची गर्दी हा आमच्यावरील विश्वासाचा पुरावा आहे, असे आश्वासन दिले. त्यांनी मोठ्या मताधिक्याने सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहनही केले. जगदीश गुरखुदे यांच्या सामाजिक बांधिलकीचा विशेष उल्लेख करत पंकजाताईंनी प्रभाग ७ मधील विकासकामे आदर्श असल्याचाही पुनरुच्चार केला. बीड शहराचा विकास आणि स्थिर नेतृत्वासाठी भाजपा हीच खरी पर्याय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रभागातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

◆ पान ४ वरून पुढे...

## शहराच्या उज्वल....

यासर्व सूचनांचा नक्कीच आम्ही विचार करु आणि शहराच्या विकास आराखड्यात याचा समावेश करु अशी ग्वाही दिली. तसेच कायद्याच्या क्षेत्रातील जाणते, सजग आणि समाजाभिमुख वकील बांधवांचे मार्गदर्शन आमच्यासाठी प्रेरणादायी ठरले. तुमचे मार्गदर्शन आणि सहकार्य आमच्यासाठी खूप आवश्यक असून, तुम्ही आशीर्वाद दिले तर त्या जोरावर शहराचे उज्ज्वल भविष्य घडवणार अशी ग्वाही दिली. तसेच येत्या २ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), समाजवादी पार्टी आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे आणि सर्व २६ प्रभागातील ५२ नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या तुतारी आणि मशाल या चिन्हा समोरील बटन दाबून विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी वकील बांधवांनी आमची शक्ती तुमच्याच पाठीशी असल्याचे आ. संदीप क्षिरसागर यांना आश्वस्त केले. यावेळी उमेदवार व पदाधिकारी, उमेदवार तसेच वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व शिवसेना (उबाठा) पाक्ष आघाडीच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे तसेच नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार यांच्या प्रचारासाठी महानंद डेअरीचे उपाध्यक्ष, सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांच्या सोबत बीड शहरातील नागरीकांच्या उपस्थितीत बैठक घेतली. यावेळी शिवराज बांगर यांची ही उपस्थिती होती.

## पन्नगेश्वर शुगर...

व्यवस्थापनाने स्पष्ट केले. या हंगामात तब्बल ३ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कारखान्याचे अध्यक्ष अक्षय मुंदडा यांनी शेतकऱ्यांसाठी पहिला हप्ता प्रतिटन २,७०० रुपये जाहीर केला. हंगामाच्या अखेरीस कारखान्याची आर्थिक स्थिती पाहून अंतिम हप्त्याचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी नमूद केले. गाळपासाठी यंदा रेणापूर, परळी, अंबाजोगाई, चाकूर, केज आणि लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस प्राधान्याने स्वीकारला जाणार आहे. शेतकऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानताना मुंदडा यांनी पानगाव परिसरातील ऊस उत्पादकांचे हित जपणे हे स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे

◆ पान ४ वरून पुढे...

आपले ध्येय असल्याची भावना व्यक्त केली. दरम्यान, दुरुस्तीच्या कामामुळे कारखान्याला नवचैतन्य प्राप्त झाले असून, यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी सकारात्मक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## गावठी पिस्तूल....

पोलीस ठाण्यात कलम ३/ २५ आर्म अक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पोलीस हवालदार बाळू सानप, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड ,आनंद मस्के, विकी सुरवसे, चालक पोलिस अंमलदार सिद्धेश्वर मांजरे आदींनी केली.

## डॉ. कराड बी.एड. ...

यावेळी बोलताना निलेश जाधव यांनी संविधानाच्या तरतुदी विषयी स्थापनेविषयी आपले मत व्यक्त केले, तसेच विद्यार्थी शिक्षिका संगीता ढोरमारे यांनी संविधानावर आधारित एक सुमधुर गीत सादर केले. यावेळी बोलताना प्रा. शिंदे सरांनी , 'प्रत्येक भावी शिक्षकाने संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्यांची जाणीव ठेवून आदर्श नागरिक घडवावेत,' असे आवाहन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. महाजन सर, प्रा. भैरवनाथ माने सर, प्राध्यापिका डॉ.आशा कांबळे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थी शिक्षिका प्रतिक्षा मोरे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थी शिक्षिका ज्योती सोमवंशी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

## पाटोद्यात महाराष्ट्र...

थेट रस्त्यावर उभी करावी लागतात. त्यामुळे त्या भागात वाहतूक कोंडी, अडथळा व गोंधळाचे वातावरण निर्माण होते. विशेषतः सकाळ व दुपारच्या वेळी रस्त्यावर वाहनांची गर्दी वाढत असून नागरिकांना आणि वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागतो. स्थानिक नागरिकांच्या मते, बँकेसमोर उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे रस्त्याची रुंदी कमी होते, दोन्ही बाजूंनी वाहने अडकतात आणि लहान अपघातांची प्रमाणही वाढले आहे. अनेक वेळा पादचाऱ्यांना रस्त्यातून जाणे कठीण होते.सततची वाहतूक कोंडी, बेताल पार्किंग, बँकेसमोरची गर्दी या सर्वामुळे बँक परिसरात सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. नागरिकांच्या मते, एखादी आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर तातडीची वाहतूक पुढे सरकवणे अवघड होईल. प्रशासनाने लक्ष देण्याची गरज वारंवाराच्या कॅश-नेट तुटवडा, सेवा ठप्प होणे आणि पार्किंगचा प्रश्न या सर्वांवर बँक व्यवस्थापनाने व स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्राहक करत असून बँक व्यवस्थापनाला याचा फारसा फरक पडत नसल्याचीही खंत व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रेमलता पारवेंच्या....

आहे. राजू जोगदंड यांनी सांगितले की, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांनी पूर्वीच उघड केले होते की प्रेमलता पारवे यांच्यावर लाचखोरीचे गुन्हे नोंद आहेत आणि त्यांचे जावई मुजीब शेख यांच्यावरही गुन्हे आहेत. तरीदेखील अजित पवारांनी नुकत्याच झालेल्या सभेत स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार दिल्याचा दावा करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. जोगदंड म्हणाले, लाचखोरीत पकडलेल्या व्यक्तीला स्वच्छ प्रतिमा म्हणणे ही जनतेची थेट फसवणूक आहे. गुन्हे सुरु असतानाही प्रेमलता पारवे यांनी, प्रेस घेवून निर्दोष असल्याचे वक्तव्य करणे अत्यंत हास्यास्पद आहे. कायद्याचा अवमान होऊ नये म्हणून योग्य कारवाई व्हावी. याशिवाय त्यांनी आरोप केला की, राष्ट्रवादी गटातील उमेदवारी प्रक्रियेत भूमाफिया, वाळूमाफिया आणि गुटखा माफिया यांचा प्रभाव वाढला आहे. प्रेमलता पारवे यांच्या माध्यमातून या सर्वांना मिळून वक्फ बोर्डाच्या जमिनी नावे करून घ्यायच्या होत्या. तसेच अन्य जमिनी देखील हडप करण्याचा डाव या लोकांचा होता. असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.


## संविधानातील मूल्यांचे...

निर्मितीमागील उद्दिष्ट नमूद केले आहे. त्यानुसार प्रत्येक भारतीय व्यक्तीने संविधानातील महत्त्वाच्या तरतुदींची माहिती करून घ्यावी व संविधानिक मूल्यांची जपणूक करावी. भारतातील लोकांनी दि. २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी राज्यघटना स्वीकारून ती स्वतःप्रत अर्पण केली आहे. या घटनेला २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्षे पूर्ण झालीआहेत. त्या निमित्ताने सहायक आयुक्त समाजकल्याण, बीड, जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड या कार्यालया मार्फत दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५रोजी सकाळी ११.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथील सभागृहात संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर या कार्यक्रमापूर्वी सकाळी ८.३० वाजता जुनी भाजी मंडई येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून संविधान सन्मान रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यान्वित असलेल्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय,बीड,विनायकविद्यालय, नॅशनल उर्दू हायस्कूल,बीड या शाळा तसेच तुलसी शिक्षण समूहाच्या महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये अंदाजे ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. संविधान दिनाचा मुख्य कार्यक्रम निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक न्याय भवनात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपअधीक्षक उमाशंकर कस्तुरे, उपायुक्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती उमेश सोनवणे, इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच सहायक संचालक डी.बी.क्षीरसागर जिल्हापरिषद उपशिक्षणाधिकारी एन.जी.हजारे, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिकविकास महामंडळ जिल्हाव्यवस्थापक, प्रणिता बोराडे, तुलसी शिक्षण समूहाचे प्रमुख प्रदिप रोड उपस्थित होते. या कार्यक्रमात लक्ष्मण गुंजाळ, सेवानिवृत्त शिक्षक, संस्कार विद्यालय बीड यांनी संविधानाचे महत्त्व या विषयावर सविस्तर व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता जावळे यांनी तर प्रस्ताविक समाजकल्याणचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश सोनवणे यांनी केल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## तलवाडा येथे स्वताहच्या अंतःकरणातले 'देवपण' शोधनारे पोपट हातागळे स्वच्छेने रोज करतात साठेंच्या पुतळ्याची सेवा

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील नविन बस स्थानक या ठिकाणी ग्रामपंचायतच्या समोर गत काही कालावधी पूर्वी मातंग समाज बांधवांच्या आस्थेचे प्रतिक समाज सुधारक आणाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे आणावरण करण्यात आलेले असून या मुळे तलवाडा गाव परिसराच्या वैभवात भर पाढल्याचे चित्र तलवाडा येथे पहावयास मिळत असुन या ठिकाणी घटनेचे रचियते संविधान धुरंधर महामानव डॉ. भिमराव(बाबासाहेब) आंबेडकर, स्वराज्य संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज यांचेही पुर्णाकृती पुतळे असुन या सर्व धरोवराची व परिसराची देखरेख, निगरानी स्वच्छता साफ सफाई करने स्थानिक प्रशासनिय जबाबदारी आसतांना देखील प्रशासनिय दुर्लक्ष होत आसल्याने येथील हे कार्य समाजातील तरुण पुढे येऊन करत असल्याचे निदर्शनास येते. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची या ठिकाणी स्थापना झाल्या पासुन नित्यनियमाने तलवाडा येथील स्वताहच्या अंतःकरणातले देवपण शोधनारे पोपट हातागळे स्वच्छेने रोज सकाळी साठेंच्या पुतळ्याची सेवा करतांना दिसुन येत आहे.

# काला हा त्याग, समर्पण, विश्वास व परिपूर्णतेचे प्रतीक : डॉ.तुळशीराम गुट्टे महाराज

### काल्याच्या कीर्तनाने दत्तधाम येथील कीर्तन महोत्सवाचा भक्तिभावात समारोप

**परळी । प्रतिनिधी**

दत्तधाम आध्यात्मिक उन्नती केंद्र, सारडगाव येथे आयोजित कीर्तन महोत्सवाचा समारोप संतसाहित्याचे अभ्यासक व मठाधिपती स्वामी डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे यांच्या काल्याच्या कीर्तनाने अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात झाला. वारकरी परंपरेतील काल्याचे तत्त्वज्ञान, भगवान श्रीकृष्णाचे चरित्र आणि भारतीय संस्कृतीचे मोल महाराजांनी सखोल अभ्यासपूर्ण पद्धतीने उलगडले. या प्रसंगी स्वामी गुट्टे महाराज यांनी सांगितले की, काला



हे वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य असून इतर संप्रदायांमध्ये काला सांगितला जात असला तरी वारकरी परंपरेत यमुनेच्या वाळवंटात श्रीकृष्णाने गोपाळांबरोबर केलेल्या काल्याप्रमाणेच काल्याचा अनुभव सप्ताहामध्ये दिला जातो. काल्याचे कीर्तन हे जीवा–शिवाच्या ऐक्याची अनुभूती देणारे आणि प्रसन्नतेचा संदेश देणारे कीर्तन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काला हा त्याग, समर्पण, विश्वास व परिपूर्णतेचा प्रतीक असल्याचे सांगत महाराज म्हणाले की, सामान्य माणसाला प्रसादरूपाने लाभणारा काला हा काल्याच्या कीर्तनातूनच प्राप्त होतो.३ वाळवंटात केलेला काला म्हणजे भगवान श्रीकृष्णाच्या चरित्राचे चिंतन असून त्यामध्ये अध्यात्म, समाजकारण आणि जीवनमूल्यांचा समतोल दिसून येतो. भगवान श्रीकृष्ण व यमुना यांच्यातील लीलांचे संदर्भ देत महाराजांनी स्पष्ट केले की, मायेच्या पलीकडे परमात्मा असून माया बाजूला ठेवून कृष्णसंगती स्वीकारणे हाच खरा जीवनाचा मार्ग आहे. श्रीकृष्णाच्या लीलांमधून भक्ती, विवेक आणि युक्ती यांचे सुंदर दर्शन घडते, असेही त्यांनी सांगितले. काल्याच्या वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट करताना महाराजांनी सांगितले की, काल्याचे विविध प्रकार असून काल्याच्या कीर्तनातून बाळक्रीडा, गवळणी व काला या माध्यमांतून श्रीकृष्णाचे संपूर्ण चरित्र उलगडले जाते. दुसऱ्यांना खाऊ घालण्याची भावना ही भारतीय संस्कृतीची ओळख असून त्यातूनच त्याग आणि सेवाभावाची शिकवण मिळते, असे त्यांनी अधोरेखित केले. भगवान श्रीकृष्णाचा अवतार परिपूर्णतेचे प्रतिक असल्याचा उल्लेख महाराजांनी केला. श्रीकृष्ण हे काळ, काळा आणि आकर्षण यांचे प्रतीक असून त्यांच्या नावातूनच जीवनातील गूढार्थ स्पष्ट होतात, असे त्यांनी सांगितले.

भगवान श्रीकृष्णाच्या विविध लीलांचे उदाहरणे, दाखले आणि धर्मसिद्धांत यांच्या आधारे स्वामी डॉ. तुळशीराम महाराज यांनी विचारप्रवर्तक काला कीर्तन सादर करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या काल्याच्या कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

## फ्लश टँकमध्ये मतदार ओळखपत्र सापडल्यासंदर्भात माहिती देण्याचे मुंबई उपनगर जिल्ह्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई उपनगर जिल्हयातील अंधेरी भागात टॉयलेट फ्लश टँकमध्ये निवडणूक मतदार ओळखपत्र सापडल्याबाबत काही मुद्रित व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांत वृत्त व व्हिडीओ क्लिप प्रसारित झाली आहे. प्रसारित व्हिडीओ क्लिपमधून कोणताही बोध होत नाही. हे वृत्त सोशल मिडिया येथून घेऊन प्रसारित करण्यात आले असल्याचा खुलासा संबधीत माध्यमांनी केला आहे. त्याची चौकशी केली असता घटना कुठे घडली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे ही बातमी व व्हिडीओ क्लिपच्या अनुषंगाने २० नोव्हेंबर. २०२५ रोजी डी. एन. नगर पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबर अहवाल (ऋखठ–१२१८/२०२५) अज्ञाताविरुद्ध दाखल करण्यात आला आहे. तरी देखील या वृत्तातील क्लिपबाबत जर कोणत्याही नागरिकांस माहिती असेल तर त्यांनी निदर्शनास आणून द्यावी. त्याची संपूर्ण चौकशी करण्यात येईल.



*बीड शहरातील सौभाग्य लॉन्स येथे मौजे चव्हाणवाडी येथील माणीकरावजी चव्हाण यांच्या मुलीच्या शुभविवाह प्रसंगी शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन चि.शुभम व चि.सौ.कां.ऋतुजा यांना पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सोबत युवासेनेचे जिल्हाप्रमुख अभिषेकजी दिवे, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख वचिष्ठ नाना शेंडगे, युवा नेते वैद्यनाथजी तोडेकर सह सर्व उपस्थित होते..!*

## त्रिभाषा धोरण समितीच्या मुंबई जिल्हा भेटीकरिता प्रश्नावली आणि मतावली उपलब्ध

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. ही समिती मुंबई जिल्हा भेटीसाठी २८ नोव्हेंबर २०२५ रोजी येत असून त्याकरिता प्रश्नावली व मतावली तयार करण्यात आलेली आहे. सदर प्रश्नावली व मतावली http://tribhashasamiti.mahait.org या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ यांनी कळविले आहे. या भेटीदरम्यान समिती सामान्य नागरिक, भाषातज्ज्ञ, विचारवंत, मराठी भाषेशी संबंधित किंवा संलग्न शासकीय किंवा अशासकीय/ खासगी संस्था यांचे अध्यक्ष/ सदस्य, राजकीय पक्षांचे नेते/ लोकप्रतिनिधी, प्राथमिक/ माध्यमिक, शिक्षक संघटना यांचे अध्यक्ष सदस्य, पालक शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, आंदोलनकर्ते इत्यादी बरोबर संवाद साधणार असून त्रिभाषा धोरणासंदर्भात त्यांची मते व विचार जाणून घेणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र कोणत्या इयत्तेपासून, कशाप्रकारे लागू करावयाचे याबाबतचे धोरण निश्चित करण्याकरिता समिती राज्यातील विविध विभाग/ जिल्हा स्तरावर भेटी देत आहे. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट, मुंबई येथे मुंबई जिल्ह्याकरीता चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. या चर्चासत्राकरिता सकाळी १० वाजता अभ्यागतांची नोंदणी सुरू होईल व प्रत्यक्ष संवाद सकाळी १०.३० वाजता सुरू होईल.

# कोटीच्या ऑडीचा मालक सापडला

**बीड । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळ्यात कोटी रूपये किमतीची ऑडीकार सापडल्यानंतर तिचा मालक कोण असा प्रश्न पडला होता. परंतू ग्रामीण पोलिसांनी गाडीचे चिसीनंबर देवून आरटीओलाच मालकाचा शोध घेण्यास सांगितले होते. त्यानुसार तब्बल १५ ते २० दिवसानंतर त्या ऑडीचा मालक हे कुटे असल्याचे पत्र आरटीओने बीड ग्रामीण पोलिसांना दिले आहे. आता पोलीस काय भूमिका घेतात आणि गाडी गाळ्यात गेली कशी याचा काय तपास करतात हेच पहावे लागेल.

तिरूमला ऑईल इंड्रस्ट्रीजपासून जवळच असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एका कुलूप बंद गाळ्यात कोट्यावधी रूपये किमतीची ऑडीकार आणि काही मशिनरी असल्या संदर्भातील माहिती गाळा मालकानेच बीड ग्रामीण पोलिसांना दिली होती. घटनास्थळी पोहचलेल्या पोलिसांना गाडी सापडली पण मालक मात्र सापडलेला नव्हता. काही दिवसानंतर कोटी रूपये किमतीच्या गाडीला लाख रूपये किमतीच्या गाडीने टोचन देवून सदर गाडी ग्रामीण पोलिसांच्या दारात लावण्यात आली. या प्रकरणी गाडीचा मालक शोधण्यासाठी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोदिराज यांनी आरटीओ कार्यालयाला पत्र व्यवहार करत गाडीच्या चिसीनंबर वरून मालक शोधून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आरटीओ कार्यालयाने सदरची गाडी कुटे



यांच्या मालकीची असल्याचा अहवाल बीड ग्रामीण पोलिसांना दिला आहे. परंतू आता प्रश्न असा निर्माण होतो की, कुटेंची गाडी गाळ्यात गेली कशी, नेली कोणी याचा तपास आता पोलिसांनाच करावा लागणार आहे.

## डॉ. सुखदेव थोरात २२ व्या समता पुरस्काराचे मानकरी

### अ. भा. महात्मा फुले समता परिषद आयोजित समता पुरस्कार २०२५ वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : ॲड. सुभाष भाऊ राऊत

**माजलगाव । प्रतिनिधी**


अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या २२ व्या समता पुरस्कार वितरण सोहळा आज शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी समता भूमी महात्मा फुले स्मारक पुणे – ४२ येथे सकाळी ९:३० वाजता संपन्न होत असून याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी केले आहे. या पुरस्कारा वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार हे राहणार असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी केंद्रीय मंत्री खा. उपेंद्र कुशवाहा यांच्या शुभहस्ते तसेच माजी खा. समीरभाऊ भुजबळ आणि आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या उपस्थितीत सदरील पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावर्षी अर्थशास्त्रज्ञ , शिक्षणतज्ज्ञ , प्राध्यापक, लेखक आणि सामाजिक चवळीचे अभ्यासक डॉ. सुखदेव थोरात २२ व्या समता पुरस्काराचे मानकरी असून ते विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आहेत. तसेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील सेंटर फॉर द स्टडी ऑफ रीजनल डेव्हलपमेंट येथे मानद प्राध्यापक आहेत. ते १९९२ पासून वॉशिंग्टन डीसी येथील आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधन संस्थेचे संशोधन सहकारी आहेत. जानेवारी २००३ ते फेब्रुवारी २००६ पर्यंत नवी दिल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीजचे संचालक होते. २००६–२०११ पर्यंत त्यांनी यूजीसीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. डॉ. थोरात यांनी कौन्सिल फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ पीपल्स ॲक्शन अँड रुरल टेक्नॉलॉजी (C-P-RT), नियोजन आयोगाचा सामाजिक न्याय विभाग, बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठाची शैक्षणिक परिषद,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , बुद्धिस्ट स्टडीज सेंटर, हैदराबाद विद्यापीठ , हिमाचल प्रदेश विद्यापीठ आणि इतर अनेक संस्थांच्या प्रशासकीय मंडळांमध्ये सदस्य म्हणून काम केले आहे. थोरात हे भारतीय सामाजिक विज्ञान आणि संशोधन परिषदेचे अध्यक्ष देखील होते. खाजगी क्षेत्रातील आरक्षणाविषयी वादचर्चा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक बहिष्कृतता व समावेशकता धोरणाविषयीचा दृष्टिकोन, बाबासाहेब आंबेडकर नियोजन जल व विद्युत विकास भुमिका व योगदान, भारतातील दलित समाज, महाराष्ट्रातील विषमता आणि गरिबी सांपत्तिक असमानता व जातीय भेदभावाचा प्रभाव आदी विषयांवर त्यांनी प्रभावी लेखन केले असून त्यांना यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार (२०११), पद्मश्री (२००८), डॉ. आंबेडकर चेतना पुरस्कार आदी पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.

# सरकारकडून रब्बी पिकासाठी धरणाचे पाणी सोडण्यासंदर्भात शासनाचे आदेश असूनही प्रशासनाकडून कारवाई का केली जात नाही ? वसंत मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित राजर्षी शाहू कन्या विद्यालयात आज २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्रीमती एस. डी. कदम (मु. अ.) यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व स्पष्ट करत म्हटले की,संविधान हा आपल्या राष्ट्राचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. प्रत्येकाने संविधानातील मूल्ये जाणून घेणे आणि त्यांचे पालन करणे आवश्यक आहे. यानंतर झालेल्या व्याख्यानात श्रीमती जे. एस. वाव्हळकर यांनी संविधानाची निर्मिती, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की,भारतीय



संविधान ही लोकशाही, समानता व न्याय यांची भक्कम पायाभरणी आहे. विविधतेत एकता हा आपल्या समाजाचा शाश्वत वारसा आहे.अध्यक्षीय भाषणात प्रा. जे. पी. शेळके यांनी विद्यार्थ्यांना संविधानातील तत्त्वांचा आचरणात अवलंब करण्याचे आवाहन केले. सजग आणि जबाबदार नागरिक घडविण्यात संविधानातील मूल्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात, असे ते म्हणाले. यावेळी मंचावर श्री. राऊत आर. टी. (मु. अ.) व श्रीमती कुलकर्णी मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. डी. एल. तिडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. एम. एच. आगलावे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे भारतीय संविधानाची उद्देशिका वाचून झाली. यावेळी मंचावर श्री. राऊत आर. टी. (मु. अ.) व श्रीमती कुलकर्णी मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. डी. एल. तिडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. एम. एच. आगलावे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे भारतीय संविधानाची उद्देशिका वाचून झाली.



अंबाजोगाई येथे ४१ व्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या उद्घाटन करताना साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्रीकांत देशमुख सोबत सचिव दगडू लोमटे,प्राचार्य कमलाकर कांबळे ....छाया :- जयराम लगसकर........



अंबाजोगाई येथे ४१ व्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात बाल आनंद मेळावा व चित्रकला स्पर्धेत चित्र रंगवण्यात मग्न विद्यार्थी व विद्यार्थीनी ....छाया :- जयराम लगसकर....

## विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सामाजिक जाणीव ठेवून मदत करणारे प्रोफेसर डॉ.दिवाण यांचा सत्कार संपन्न

### दान पारमितेचे पालन करून धम्मदीप बुद्ध विहारा करिता धम्मदान

**बीड । प्रतिनिधी**

भीम जयंती असो, सामाजिक, शैक्षणिक, संस्कृतिक व विध्यार्थी हिताच्या कार्यक्रमात तसेच महामानव अभिवादन ग्रुप बीड व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला मौलिक मार्गदर्शन व सहाय्य करणारे प्रा. डॉ शिवाजीराव दिवाण यांना प्रोफेसर पदी पदोन्नती मिळाल्या बद्दल धम्मदीप बुद्ध विहार (बलभीम नगर) शिवाजीनगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप, वाचाल तर वाचाल वाचनालय व धम्मदीप बुद्धविहार कमिटी तर्फे मा. से. नी. सी ई ओ पी. व्ही. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रो. डॉ. उपप्राचार्य उत्तमराव साळवे यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व त्रिसरण



पंचशील हाच जीवनमार्ग देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. जी. वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड तेजस वडमारे यांनी केले. विचारमंच्यावर अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जी एम भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले, ॲड हनुमंत कांबळे,प्रशांत वासनिक, डी एम राऊत यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम तथागतांच्या प्रतिमेस पुष्प,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून त्रिवार अभिवादन करण्यात आले. त्रिसरण पंचशील ग्रहण केल्या नंतर सत्कार मुर्ती डॉ दिवाण च्या सुविद्य पत्नी सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका आयु माया दिवाण –सोनवणे आपल्या मनोगतात जीवनसाथी बद्दल भावुक होऊन बोलतांना म्हणाल्या की, जीवन साथी बद्दल बोलतांना एकाच वाक्यात बोलेल की डॉ. दिवाण सर एक भला माणूस आहे. ह्या त्यांच्या एका वाक्यातच सरांची विध्यार्थ्यां बद्दल मदतीची तळमळ त्यांनी शिक्षण काळ भोगले कष्ट व खेड्यातून येऊन उच्चशिक्षणासाठी घेतलेले परिश्रम आणि त्यातून मिळविलेल्या ज्ञानाचा व आर्थिक सुबत्तेचा उपयोग डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्या प्रमाणे उत्पन्नाचा २०वा भाग समाजाच्या उद्धाराकरिता दान रूपात केला पाहिजे हे लक्षात ठेऊन पदोन्नती झाल्यामुळे ( इन्क्रिमेंट )पगार वाढीचा पहिला लाभ तथागतांनी सांगितलेल्या दान पारमितेचे पालन करून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल वाचनालय करीत असलेल्या सामाजिक कार्याकरिता तसेच बीड शहराच्या मध्यभागी असलेल्या धम्मदीप बुद्ध विहाराच्या अपुऱ्या राहिलेल्या

## टेनिस बॉल क्रिकेटच्या जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

टेनिस बॉल क्रिकेट या खेळाला २०२१ पासून स्पोर्ट्स अँड युथ अफेर्स गव्हरमेंटऑफ इंडिया ची मान्यता मिळालेली आहे. केंद्र शासनाच्या खेळाडू कोट्या मधील खेळाडूंना शासकीय सेवांमध्ये डायरेक्ट नियुक्ती केली जाते. इन्कम टॅक्स, पोस्ट ऑफिस, रेल्वे ई. अशा विविध ठिकाणी महाराष्ट्रातील ६० खेळाडू व भारतातील ३५० खेळाडूंना शासकीय नोकरी मिळाली आहे. अशा शासकीय नोकरीसाठी पात्र असणार्या खेळाच्या खेळाडूंसाठी नंदुरबार येथे होणार्या टेनिस बॉल क्रिकेटच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी ३० नोव्हेंबर २०२५ रोजी तेलगाव नाका येथील टर्फ मध्ये घेतली जाणार आहे. निवड झालेला संघ नंदुरबार येथे होणार्या टेनिस बॉल क्रिकेटच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धांमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धा १९ वर्षे खालील मुले / मुली या वयोगटात घेतल्या जाणार आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी बीड जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन कडे या निवड चाचणीमध्ये सहभागी होणार्या खेळाडूंनी जिल्हा संघटनेकडे आधार कार्ड व रजिस्ट्रेशन फीस भरून नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी झालेल्या खेळाडूंची सकाळी ८ ते १० दरम्यान निवड चाचणी घेतली जाणार आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये राज्याचा संघ निवडला जाणार आहे. व तो निवडलेला संघ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा संघटनेचे सचिव रामदास गिरी यांच्याशी संपर्क साधावा मो.९८८११५९६०७






दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

# शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपले सहकार्य आवश्यक : आ. संदीप क्षीरसागर

### ● शहरातील वकील बांधवांशी साधला संवाद

बीड । प्रतिनिधी

शहराचा विकास आणि दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी तसेच शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपले मोलाचे सहकार्य आवश्यक असल्याचे आ. संदीप क्षीरसागर यांनी शहरातील वकील बांधवांशी बोलताना सांगितले आहे.



यावेळी शहरातील वकील बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी वकील बांधवांनी केलेल्या सूचनांचा शहर विकास आराखड्यात समावेश करण्यात येईल असे आश्वासन देताच वकील बांधवांनी तुतारीलाच पाठिंबा असल्याचे जाहीर केले. तसेच महानंद डेअरी उपाध्यक्ष रामकृष्ण बांगर यांनी ही बैठक घेतली आहे.

बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने गुरुवारी (दि.२७) बीड जिल्हा वकील संघाची बैठक झाली आहे. या बैठकीमध्ये सहभागी होत आ. संदीप क्षीरसागर यांनी वकील बांधवांशी शहराचा विकास, नागरिकांच्या दैनंदिन समस्या आणि आगामी काळात शहरात सकारात्मक परिवर्तन घडविण्याबाबत सविस्तर संवाद साधला. यावेळी वकील बांधवांनी आपल्या काही सूचना आणि शहराच्या विकासाविषयी संकल्पना मांडल्या ▶ उर्वरित पान २ वर

# पन्नगेश्वर शुगर मिल्सच्या २०२५-२६ च्या गळीत हंगामाला सुरुवात

**अत्यंत साधेपणात सोहळा ; पहिला हप्ता २,७०० रुपयांचा देण्याची अक्षय मुंदडा यांची घोषणा**

रेणापूर । प्रतिनिधी

पानगाव येथील पन्नगेश्वर शुगर मिल्सच्या २०२५-२६ गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी अत्यंत साध्या पद्धतीने करण्यात आला. राज्यात निवडणुकांची धामधुम असल्याने कोणताही समारंभ न करता कारखाना परिसरातच प्रतिकात्मकरित्या हंगामाची सुरुवात झाली. लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे आणि स्व. विमलताई मुंदडा यांच्या प्रतिमांना



अभिवादन करून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

हा कारखाना लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी पानगाव परिसरातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन सुरु केला होता. मात्र, गेली तीन वर्षे कारखाना बंद अवस्थेत होता. छउड्ढ च्या प्रक्रियेनंतर अक्षय मुंदडा यांनी यंदाच्या जून महिन्यात कारखान्याचा ताबा घेतला. ताबा मिळाल्यानंतर १५ जूनपासून व्यापक दुरुस्ती, उपकरणे बदल आणि तांत्रिक सुधारणा यांची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली. विशेषतः जुना बॉयलर काढून संपूर्णतः नवीन बॉयलर बसवण्यात आल्याने यंदा गाळप पूर्ण क्षमतेने होणार असल्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या इसमास अटक

बीड । प्रतिनिधी



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक पार्श्वभूमीवर तपासणी चालू असतांना अवैध पिस्तूल बाळगणाऱ्या इसमाची गोपनीय माहिती काढून सौताडा येथील विशाल मरकस मस्के याला पोलिसांनी ताब्यात घेतले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असतांना दिनांक २५ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की विशाल मस्के हा सौताडा येथील एका हॉटेलवर कमरेला पिस्तूल लावून कोणाची तरी वाट पाहत आहे. याची माहिती मिळताच पथकाने तात्काळ या ठिकाणी जाऊन सापळा रचून विशाल मस्के याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्यांच्या पँटच्या आत मध्ये कमरेला गावठी पिस्तूल लावलेले सापडले. हे पिस्तूल जप्त करण्यात आले. तसेच मस्के यांच्या विरुद्ध पाटोदा ▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ. कराड बी.एड. व संत भगवान बाबा एम.एड. कॉलेजमध्ये संवैधानिक मूल्यांचा जागर

### केज येथे संविधान दिन उत्साहात

केज । प्रतिनिधी

येथील प्राध्यापक डॉ. विश्वनाथराव कराड बी.एड. कॉलेज आणि संत भगवान बाबा एम.एड. कॉलेज मध्ये आज, २६ नोव्हेंबर रोजी, 'संविधान दिन' (Constitution Day) मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पंचमहालकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते आदराने पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिक्षक यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे (Preamble) सामूहिक वाचन केले. तसेच, समानता, न्याय व बंधुता या मूल्यांचे जतन करण्याची शपथ घेतली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाटोद्यात महाराष्ट्र ग्रामीण बँक असून अडचण नसुन खोळंबा कधी कॅश नसते तर कधी नेट पार्किंग व्यवस्था नसल्याने ग्राहक त्रस्त

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहराच्या मध्यवर्ती भागात महाराष्ट्र ग्रामीण बँक असूनही ग्राहकांना सुरळीत सेवा मिळण्याऐवजी सततची खोळंबा व गैरसोय सहन करावी लागत आहे. बँकेत वारंवार कधी कॅश उपलब्ध नसते तर कधी नेटवर्क ठप्प होते. त्यामुळे बँकेसमोर व्यवहारासाठी येणाऱ्या ग्राहकांच्या रांगा लागतात दिवसभरात अनेकांना हातची कामे राहून परत फिरावे लागत असल्याने नाराजी वाढली आहे. ग्राहकांचे म्हणणे आहे की, बँकेत येतो तेव्हा कधी कॅश संपलेली असते, कधी इंटरनेट बंद असते. कोणतीही पूर्वसूचना नसल्याने अंगावरच येते. ही परिस्थिती जवळपास रोजचीच झाली आहे.



बँकेसमोर स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था नसल्याने ग्राहकांना आपली वाहने ▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रेमलता पारवेंच्या गुन्ह्यांचे थेट पुरावेच सादर

**रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांचा मोठा राजकीय स्फोट**

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत मोठा राजकीय स्फोट झाला आहे. प्रेमलता दादाराव पारवे या ५०० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडल्या गेल्या होत्या, असा थेट पुराव्यासह गंभीर आरोप रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी माध्यमांसमोर



केला, आणि त्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. चार दशकांनंतर मागासवर्गीय महिलेला बीड नगराध्यक्ष पदाचे आरक्षण मिळाले असताना, राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी लाचखोर व गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तीस उमेदवारी देण्याचा धक्कादायक निर्णय घेतला, अशी टीका केली जात ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● असे आहेत गुन्हे दाखल

**प्रेमलता दादाराव पारवे ह्या बीडच्या भू-संपादन कार्यालयात क्लार्क असतांना, एक किरकोळ ना हरकत प्रमाणपत्रासाठी त्यांनी सामान्य शेतकऱ्याकडून दि. २८/०५/२००३ साली ५०० रुपयांची लाच घेतली होती. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन अटक केली होती. तसेच प्रेमलता पारवे व त्यांचा जावई मुजीब शेखवरही सध्या बीड कोर्टात ४२७,४९८ (अ),३२३,५०४,५०६,३४ केस सुरु आहे.**

# के.एस.पी.विद्यालय येथे संविधान दिन उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

के.एस.पी. विद्यालय, बीड येथे संविधान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून, मुलांना संविधान दिना बदल अवगत करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांन करिता हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ४ थी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला.

# संविधानातील मूल्यांचे पालन करा: निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी

बीड । प्रतिनिधी

निवासी उपजिल्हाधिकारी, शिवकुमार स्वामी यांनी अध्यक्षीय भाषणात असे प्रतिपादन केले की , राज्य शासनाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त २६ नोव्हेंबर, २०२४ पासून घर घर संविधान हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर



विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.भारताची राज्यघटना सर्वसमावेशक अशी असून त्यामध्ये मागासवर्ग व दुर्बल



घटकांच्या कल्याणासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार समाजातील मागासवर्गीय घटकासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या कल्याणकारी योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. संविधानाची उद्देशिका हा संविधानाचा गाभा असून या उद्देशिकेमध्ये राज्यघटना ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### २ डिसेंबर मंगळवार रोजी मतदानाच्या दिवशी भरत असलेले आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील (बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई) या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने दिनांक ०२ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी मतदान प्रक्रीया होणार असल्याने संबंधीत तहसीलदार व जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी या कार्यालयास दिनांक ०२.१२.२०२५ वार मंगळवार रोजी भरत असलेल्या आठवडी बाजारांची माहिती या कार्यालयास सादर केली आहे. पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ०२ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी बीड जिल्हयातील (बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई) या निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरपालिका क्षेत्रातील आठवडी बाजार बंद ठेवणे अथवा पुढे ढकलण्यास हरकत नसलेवावत नमूद केले आहे. दिनांक ०२ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी मतदानाच्या दिवशी खाली नमूद ठिकाणी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आवाहन अपर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे. तालुका/नगरपालिका अंबाजोगाई येथे दि.०२ डिसेंबर २०२५ मंगळवार मतदानाच्या दिवशी भरणाऱ्या आठवडी बाजाराचे ठिकाण अंबाजोगाई नगर परिषद हद्दीतील कृषी उत्पन्न बाजार समिती, मोंढा मार्केट यार्ड परिसर व मांडवा रोड तसेच दि.०२ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी मतदानाच्या दिवशी बीड जिल्ह्यातील वरील ठिकाणी भरविण्यात येणारे आठवडी बाजार बंद ठेवून या दिवशीचे बाजार हे अन्य दिवशी भरविण्यात यावेत असे प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

### प्रभाग एकचे शरद यादव फक्त सोशल मीडियावरचे उमेदवार, मतदारात रंगल्या चर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्रात माजलगाव शहरात सुद्धा नगरपरिषद निवडणुकीची धामधूम सुरू आहे प्रत्येक नगरसेवक पदाचे उमेदवार व नगर अध्यक्षपदाचे उमेदवार आपापल्या प्रभागांमध्ये वा नगराध्यक्षपदाचे उमेदवार शहरांमध्ये आपापल्या परीने प्रचार करत आहेत व निवडून येण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु प्रभाग क्रमांक एक चे तुतारीचे उमेदवार शरद यादव हे प्रत्यक्ष जनतेत न जाता व जनतेत जाऊन प्रचार न करता फक्त सोशल मीडियावर आपला प्रचार करत आहेत अशी चर्चा प्रभाग एक मधील सर्व नागरिकात होत असताना दिसत आहे कुठलेही विकास काम न करता फक्त सोशल मीडियावर पोस्ट करणे व जनतेला खोटी आश्वासन देणे हेच कामे आतापर्यंत प्रभाग एकचे तुतारीचे उमेदवार शरद यादव यांनी केलेले आहेत अशी जोरदार चर्चा नागरिकात व प्रभाग एकच्या मतदारात होत असल्याने शरद यादव यांच्यावर प्रभाग एक मधील सर्व जनता मोठ्या प्रमाणात नाराज असल्याचे दिसून येत असून त्यांच्या विरोधात मोठा असंतोष प्रभागातील नागरिकात मतदारात दिसत आहे यांची तुतारी तिसऱ्या नंबर वर फेकल्या जाते की चौथ्या नंबर वर फेकले जाते अशा चर्चा प्रभाग एक मधील नागरिक ठिकठिकाणी करताना दिसत आहेत आता येत्या तीन डिसेंबरलाच कळेल त्यांची जागा तिसऱ्या नंबर वर आहे की चौथ्या नंबर वरती.

### महिला महाविद्यालय गेवराई येथील हिंदी विभागाची सह्याद्री बँकेला भेट




गेवराई । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला महाविद्यालय गेवराई च्या हिंदी विभागाच्या वतीने विद्यार्थिनीं अध्ययन उपक्रमांतर्गत शहरातील सह्याद्री पतसंस्था महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. गेवराई येथील बँकेला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी बँकिंग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी व राजभाषा हिंदीत चालणारा व्यवहार व कामकाजाची माहिती तसेच व्यावहारिक ज्ञान प्राप्त होऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोंडगे टी.पी.यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संगीता आहेर व प्रा. डॉ. रामहरी काकडे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. या भेटीमध्ये शाखा व्यवस्थापक श्री. सखाराम गुडे व रेणुका गुडे यांनी विद्यार्थिनींशी मनमोकळा संवाद साधत महिलांना उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी व विविध आव्हाने तसेच बदलत्या काळानुसार स्वतः आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता याविषयी माहिती दिली. या शैक्षणिक सहलीमध्ये विद्यार्थिनी उपस्थित होत्या.